**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/ ८३५९२८ /२०२४ पिंपरी-चिंचवड दिनांक- २२ /०३/२०२४

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

देहुगाव या ठिकाणी दिनांक २७/०३/२०२४ रोजी संत श्रेष्ठ श्री.तुकाराम महाराज बिज उत्सव साजरा होत आहे. बिजनिमीत्त संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज मंदीर येथे मोठ्या प्रमाणावर वारकरी संप्रदायातील सदस्य सामान्य भाविक,वारकरी,महिला भगीनी मुले दर्शनासाठी येतात. दर्शनासाठी येणाऱ्या भाविक हे मोठ्या संख्येने आप-आपली वाहने घेवुन कुटूंबासह देहुगाव येथे येत असतात.त्यामुळे देहूगाव परिसरात वाहतूक कोंडी होत असते.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाला आहे त्याअर्थी मी विशाल गायकवाड, पोलीस उप-आयूक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**तळवडे, महाळुंगे, चाकण वाहतुक विभाग अंतर्गत**

१) देहुगाव कमान (जुना मुंबई-पुणे हायवे) येथुन देहुगाव कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनासाठी प्रवेश बंद करण्यात येत आहे. (सार्वजनिक वाहतुक बसेस व दिंडीतील वाहने वगळून )

२) महिंद्रा सर्कलकडुन फिजुत्सु कॉर्नर अथवा कॅनबे चौक/आयटी पार्क चौकाकडे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांस प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – महिंद्रा सर्कल ते निघोजे ते मोईफाटा मार्गे डायमंड चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

३) तळेगाव-चाकण रोडवरील देहुफाटा येथुन देहुगाव जाणारे रस्त्यावरुन सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदर मार्गावरील वाहने एच.पी.चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

४) नाशिक पुणे हायवेवरील चाकण तळेगाव चौक तसेच स्पायसर चौक येथून महिंद्रा सर्कल मार्गे आयटी पार्क/ कॅनबे चौक जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** १.- सदर मार्गावरील वाहने हि मोशी भारतमाता चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग** २.- सदर मार्गावरील वाहने महिंद्रा सर्कल- इन्डुरन्स चौक -एच पी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

५) देहु कमान ते १४ टाळकरी कमान ते भैरवनाथ चौक हा रस्ता सर्व प्रकारचे वाहनांसाठी बंद.

६) खंडेलवाल चौक ते देहुकमान (मुख्य) ते परंडवाल चौक हा रस्ता सर्व प्रकारचे वाहनांसाठी बंद.

७) जुना पालखी मार्ग (कंद पाटील चौक) ते झेंडे मळा (जकातनाका) जाणारी वाहतुक वन-वे (एकदिशा मार्ग) करण्यांत येत आहे.

तरी वरील वाहतुक बदल हा दिनांक २५/०३/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपासून ते दिनांक २७/०३/२०२४ रोजी रात्रौ २१.०० वाजे पर्यंत अथवा वाहतुक सुरळीत होई पर्यंत **(अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन)** सर्व प्रकारचे वाहनांचे वाहतुकीसाठी बंद राहील.

Scanned with OKEN Scanner

तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा तसेच देहूगाव परिसरात रहिवाशी वस्ती वाढल्याने पार्किंग व्यवस्थेच्या अभावी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी जास्तीत जास्त सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा असे आवाहन पिंपरी चिंचवड वाहतूक शाखेमार्फतीने करण्यात येत आहे.

(विशाल गायकवाड)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी तळवडे, महाळुंगे, चाकण वाहतुक विभाग

/- सदर वाहतूक बदलाचे अनुषंगाने योग्य तो बंदोबस्त लावण्यात येवुन वाहनचालकांना मार्गदर्शन करणारे फलक ठिकठिकाणी लावण्यात यावेत.

Scanned with OKEN Scanner